नियमीत फौ. ख. क्र. ४६/२०२२
सरकार वि. सुरेश + १
निशाणी– २०.

**सरकारपक्षातर्फे साक्षीदार क्र. १ ची जबानी.**
**मी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,**

**माझे नाव** – शिवाजी पाडुरंग नेव्हल,
**वय**– ५० वर्ष– धंदा– तलाठी.
**राहणार** – तलवाडे रोड, चांदवड, ता. चांदवड, जि. नाशिक.

..................................................................................................

**सरकारपक्षाच्या वतीने साक्षीदाराचा सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्री. एन. पी. मोरे यांच्या मार्फत शपथेवर सुरु.**

**०१.** दिनांक ०२/०२/२०२२ रोजी मी मौजा हिरापूर येथील साजावर तलाठी म्हणून कार्यरत होतो. सण २०१७ पासून त्या ठिकाणी कार्यरत होतो. दिनांक ०२/०२/२०२२ रोजी मी तहसील कार्यालयातून हिरापूर तलाठी कार्यालयाकडे निघालो होतो. त्यावेळी रस्त्याने मला माहिती मिळाली की, माझ्या साज्यात कोलटेक पाटीवरुन मुरुमाची वाहतूक सुरु आहे. मी त्यावेळी वरिष्ठ मंडळ अधिकारी कैलास बागूल यांना त्याबाबत माहिती दिली व कोलटेक पाटीवर येण्याचे सांगितले. त्यानंतर ते त्या ठिकाणी आले. आम्हाला हिरापूर ते लालसगाव रस्त्यावर कोलटेक पाटी येथे एक हायवा क्रं. एम एच १६–६१८१ दिसला, आम्ही त्याला हात दाखवून थांबवले. त्यावेळी त्याने कोलटेक पाटीजवळ लासलगावकडे जाणा–या रस्त्यावर ठोके यांच्या हॉटेलसमोर थांबवला. मी त्यावेळी चालकाला माझी ओळख करुन दिली व गाडीत काय आहे याबाबत विचारले. त्यावेळी त्याने हायवा गाडीत मुरुम असल्याचे सांगितले. त्यावेळी त्याला मी मुरुमाबाबत परवानगी आहे किंवा कसे याबाबत विचारपूस केली. त्यावेळी त्याने त्याच्याकडे कोणताही परवाना नसल्याचे सांगितले. त्यानंतर मी पंचांना बोलावून हायवाची पाहणी केली. त्यावेळी त्यात मुरुम दिसून आला. त्यावेळी दोन पंच भागवत ठोके व अनिल ठोके होते. त्यावेळी चालकाने हायवाचा मालकाला फोन केला व मालक त्या ठिकाणी हजर झाला. त्यावेळी मालकाला गाडी तहसील कार्यालयात घेवून चालण्यास सांगितले मात्र ते ऐकत नव्हते. त्यानंतर चालक हायवा गाडी घेवून निघूण गेला. त्यानंतर आम्ही गाडीचा फोटो व केलेला पंचनामा घेवून तहसील कार्यालयात तहसीलदारांकडे गेलो. त्यावेळी त्यांना माहिती दिली व पंचनाम्याचे फोटो त्यांना दाखविले. त्यानंतर तहसीलदाराने आदेश

दिला व त्यानंतर दुस–या दिवशी गुन्हयाची नोंद झाली. आता मला फिर्याद दाखविण्यात आली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्याला **<u>नि. क्रं. २१</u>** देण्यात आला. आता मला छापील प्रथम खबरी अहवाल दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्याला **<u>नि. क्रं. २२</u>** देण्यात आला. आता मला मी केलेला पंचनामा दाखवला, त्यावर माझी व पंचाची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्याला **<u>नि. क्रं. २३</u>** देण्यात आला. पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा केला होता. त्यावेळी पंच म्हणून कासव व निंबाळकर हजर होते. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखवला, त्यावर माझी व पंचाची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्याला **<u>नि. क्रं. २४</u>** देण्यात आला. आरोपींना पाहिल्यास ओळखू शकतो. आज आरोपी न्यायालयात हजर आहे.

**सरतपास संपला.**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे श्री. ए. टी. देवरे वकिल यांच्यामार्फत शपथेवर सुरु.</u>**

०२. मी मुख्यालयाच्या ठिकाणी चांदवड येथेच राहतो. मी कुटुंबासह हिरापूर या ठिकाणी राहत नाही.

**साक्षीदाराने त्याची प्रकृती ठिक नसल्याचे सांगून पुढील तारीख पुढील उलटतपासा करीता देण्याची विनंती केली. साक्षीदाराला उलटतपास देण्याकरीता पुढील तारीख देण्यात आली. सदर आदेशाची/पुराव्याची प्रत तहसीलदार चांदवड यांना पुढील माहीती करीता पाठविण्यात यावी.** **श्रवणोत्तर स्वीकृती,**

sd/–
**(एस. एस. छल्लाणी)**
**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,**
**चांदवड .**

**दि. २४/०७/२०२५.**

sd/–

**(एस. एस. छल्लाणी)**
**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,**

**चांदवड.**

नियमीत फौ. ख. क्र. ४६/२०२२
सरकार वि. सुरेश + १
निशाणी– २०.

<u>उलटतपास आरोपीतर्फे श्री. ए. टी. देवरे वकिल यांच्यामार्फत शपथेवर पुढे सुरु.</u>

३. मी २५ वर्षापासून नोकरीवर आहे. दिनांक ०२/०२/२०२२ रोजी चांदवड कार्यालयात मिटींग होती व त्याकरीता मी आलो होतो. मिटींग मंडळ अधिका–याने बोलाविली होती. मी त्याबाबत अहवाल दाखल करु शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, उत्खनन हे सरकारी मालमत्तेवरच केले गेले असल्यास अवैद्य असते. उत्खनन कोणत्या गट क्रमांकात सुरु होते त्या गटाचा गट क्रमांक व मालकाचे नाव मला सांगता येणार नाही. मी प्रत्यक्ष मौक्यावर जाउन गट क्रमांक व त्या गट क्रमांकाच्या मालकाबाबत चौकशी केली नाही. असे घडले नव्हते की, गावठाणातील मुरुम उचलला व गावातील व्यक्तीने आमच्याकडे तक्रार दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, शेतक–याला त्याची स्वतःची जमीन समतल करुन घ्यायची असल्यास त्याला आमच्या कार्यालयाकडून परवानगी घेण्याची आवश्यकता नसते. हे म्हणणे खरे आहे की, शेतक–याला त्याच्या गटात जमीन समतल करण्यासाठी ट्रक्टर व डंपर वापरता येते. हे मला सांगता येणार नाही की, संजय छगन महाले याच्या गटाची जमीन समतल करणे सुरु होते किंवा कसे. मी त्या वेळी हिरापूर येथे राहत होतो. आम्ही संजय छगन महाले याच्या गटामध्ये जाउन चौकशी केली नाही. डंपरमधील मुरुम कुठूण आणला होता याबाबत व त्या जागेबाबत सविस्तर चौकशी केली नव्हती. हे मला सांगता येणार नाही की, संजय छगन महाले हे दहीवद शिवारात शेतजमीन समतल करीत होते किंवा कसे. हे म्हणणे खरे आहे की, दिघवद शिवार माझ्या कार्यक्षेत्रात नव्हते. हे मला सांगता येणार नाही की, तेथील तलाठी व मंडळ अधिका–याने त्याबाबत तपास केला किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही कोणतीही शहानिशा न करता व बेकायदेशीर रित्या डंपर हा तहसीलदारांच्या ताब्यात दिला होता. हे म्हणणे खरे आहे की, मुरुम ज्या ठिकाणावरुन आणला होता त्या जागी जाउन पंचनामा केला नव्हता. मुरुम ज्या ठिकाणावरुन आणला त्या ठिकाणी जाउन पंचनामा का केला नाही कारण त्याची मला गरजच पडली नाही. हे म्हणणे खरे नाही की, शासकीय पदाचा गैरवापर करुन आरोपीविरुध्द खोटे प्रकरण दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, दुस–याच्या सांगण्यावरुन शहानिशा न करता आरोपीविरुध्द खोटी कार्यवाई केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी पळून गेला होता हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, शाब्दीक वाद झाले हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रत्यक्ष जागेवर न जाता हायवा गाडीचा वापर करुन

खोटे प्रकरण दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, हिरापूर, कोलटेक व दहिवद वेगवेगळया साजा आहे. दहिवद परिसर माझ्या कार्यक्षेत्रात येत होते. मी त्या ठिकाणी गेलो नव्हतो. साक्षीदार सांगतो की, जमीन समतल करण्याबाबत त्याला माहिती नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या कार्यक्षेत्रात बेकायदेशीर उत्तखनन चालू असल्यास ते माझे अधिकारात येते. हे म्हणणे खरे आहे की, व्यक्तीगत जमीन समतल करण्याबाबत आमच्या अधिकार क्षेत्रात येत नाही.

४. हे म्हणणे खरे आहे की, कोलटेक फाटा चांदवड–लासलगाव रस्त्यावर आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या रस्त्यावर रहदारी असल्याने अनेक वाहने चालू असतात. हायवामध्ये असलेला मुरुम हा सरकारी किंवा खाजगी जागेवरुन आणला होता याबाबत मी चौकशी केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीविरुध्द संशयावरुन कार्यवाई केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मुरुम आरोपीची खाजगी मालमत्ता होती व शहानिशा न करता आरोपीविरुध्द खोटे प्रकरण दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी कायदेशीर शहानिशा न करता आरोपीविरुध्द खोटी दंडात्मक कार्यवाई केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, पदाचा गैरवापर करुन आरोपीविरुध्द त्यांना त्रास देण्याकरीता खोटी कार्यवाई केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास काही नाही.**

वा. दा. कबूल केले.

Digitally signed by SUMIT SURESHCHANDRA CHHALLANI
Date: 2025.08.21 15:41:55 +0530

**(एस. एस. छल्लाणी)**
**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,**
**चांदवड .**

**दि. २१/०८/२०२५.**

समक्ष,

Digitally signed by SUMIT SURESHCHANDRA CHHALLANI
Date: 2025.08.21 15:42:01 +0530

**(एस. एस. छल्लाणी)**
**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,**

**चांदवड.**